क्रमांक: चांबांयो-२०१७/प्र.क्र.१३४/का.१४१८

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ९ फेब्रुवारी, २०१८.

विषय: चांदा ते बांदा योजने अंतर्गत सन २०१७-१८ साठी निधी वितरीत करणेबाबत.
मागणी क्र. ओ -०७ (३४५१A०२८),मागणी क्र.ओ-१०(४५१५०९०५)

वाचा:

१) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि. २९/०६/२०१६.
२) शासन निर्णय,नियोजन विभाग क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि. ०७/०७/२०१७.
३) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र. अर्थसंकल्प-२०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दि. १८/०४/२०१७.
४) वित्त विभागाच्या क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०/०६/२०१७
५) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. डिएपी-१०१६/प्र.क्र.१८६/का.१४८१, दि. १८/११/२०१६.
६) शासन ज्ञापन, नियोजन विभाग क्र. चांबांयो-२०१७/प्र.क्र.१३४/का.१४१८, दि. १२/०१/२०१८.

ज्ञापन:

उपरोक्त संदर्भ क्र. ६ येथील शासन ज्ञापन रद्द करण्यात येत आहे.

२. चांदा ते बांदा योजनेकरीता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद वितरीत करण्याबाबत सुधारीत ज्ञापन खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

३. राज्याच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये “महाराष्ट्राच्या दोन टोकावरील चंद्रपूर व सिंधुदुर्ग हे खनिज व नैसर्गिक संपत्तीचे वरदान लाभलेले जिल्हे आहेत. या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर व्हावा यासाठी सघन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्यात येईल” अशी घोषणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यामध्ये प्रथमत: सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीसाठी रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट हा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यासाठी चांदा ते बांदा ही योजना राबविण्यास संदर्भ क्रमांक (४) येथील दि. २९/०६/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये चांदा ते बांदा योजनेची उद्दीष्ट्ये, निवडण्यात आलेली विकास क्षेत्रे, कार्यक्रमाची अंमलबजावणी, प्रशासकीय खर्च आणि कार्यक्रमाचे संनियंत्रण व मुल्यमापन इ. बाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

४. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता चांदा ते बांदा योजनेकरीता खालीलप्रमाणे तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

(रु. कोटीत)

अ.क्र.	मागणी क्र.	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पीत तरतूद	बीडीएस वर उपलब्ध केलेली तरतूद	या ज्ञापनाद्वारे वितरीत करण्यात येत असलेली तरतूद
१	ओ-७	३४५१ ऐ ०१९	५.००	४.००	००
२	ओ-७	३४५१ ए ०२८	१४५.००	११६.००	१०१.५०
३	ओ-१०	४५१५ ०९०५	४५.००	३६.००	३६.००
		एकूण	**१९५.००**	**१५६.००**	**१३७.५०**

५. वित्त विभागाच्या दि. ३०/०६/२०१७ च्या परिपत्रकान्वये खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी महसुल खर्चाबाबत ७० टक्के व भांडवली खर्चाबाबत ८० टक्के निधी सन २०१७-१८ करिता वितरीत करण्यास संबंधित प्रशासकीय विभागांना प्राधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार चांदा ते बांदा योजनेअंतर्गत उपलब्ध निधी चंद्रपूर व सिंधुदूर्ग या दोन जिल्ह्यांच्या मंजूर आराखड्यातील मागणीनुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदुर्ग यांना सोबतच्या"विवरणपत्र अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

६. योजना राबविताना संदर्भाधीन शासन निर्णयातील व शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. वर नमूद केलेल्या लेखाशिर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेला खर्च याबाबत ताळमेळ घालुन प्रत्येक महिन्यात केलेल्या खर्चाचा अहवाल पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

६. संबंधित जिल्हाधिकारी यांनी सदर निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्रे तात्काळ सादर करावीत.

७. सदर ज्ञापनान्वये वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचा विनियोग करताना महाराष्ट्र विनियोजन अधिनियम-२०१५ निधी वितरण याविषयी वित्त विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दि.१८/०४/२०१७ मधील परिच्छेद क्र. ७ ते १८ व सदर शासन परिपत्रकासह जोडलेल्या परिशिष्टातील अ.क्र. ९ मधील तपासणी सूचित नमूद केलेल्या बाब १ ते१० मध्ये नमूद अटींची पूर्तता होत असल्याची खात्री जिल्हाधिकारी स्तरावर करण्यात यावी. सदर शासन परिपत्रकातील तरतूदी/निर्देशानुसार प्रस्तुत ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२११५७०११२१६ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.02.12 12:01:04 +05'30'

(वि.फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदुर्ग
२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, जि. चंद्रपूर व सिंधुदुर्ग.

प्रत:

१) मा. मंत्री, नियोजन यांचे खाजगी सचिव,
२) मा. राज्यमंत्री, नियोजन यांचे खाजगी सचिव,
३) महालेखापाल-१ (लेखा च अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल-१ (लेखा च अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,

५) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
६) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
७) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर आणि कोकण विभाग
८) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जि. चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग
९) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर आणि कोकण विभाग
१०) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जि. चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग,
११) वित्त विभाग, अर्थ-१६, मंत्रालय, मुंबई,
१२) उप सचिव, (का.१४१८) नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक,
१३) निवड नस्ती, का. १४१८ नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई.

(शासन ज्ञापन क्र.चांबांयो-२०१७/प्र.क्र.१३४/का.१४१८ दि. ९.२.२०१८ सोबतचे विवरणपत्र)

विवरणपत्र-अ

चांदा बांदा योजनेअंतर्गत सन २०१७-१८ साठी निधी वितरण

(रु.कोटीत)

अ.क्र.	लेखाशिर्ष	तपशीलवार लेखाशीर्ष	अर्थसंकल्पित तरतूद	या ज्ञापनान्वये वितरीत करण्यात येत असलेली तरतूद		एकूण वितरीत तरतूद
				चंद्रपूर	सिंधुदुर्ग	
१	मागणी क्र.O-७ चांदा ते बांदा योजने अंतर्गत विकास योजना राबविणे (३४५१A०२८)	२०, इतर प्रशासकीय खर्च	२.५०	१.७५	०.००	१.७५
		२१, पुरवठा व सामुग्री	४.७५	३.३३	०.००	३.३३
		३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१०६.००	११.२०	६३.००	७४.२०
		३३, अर्थसहाय्य	२७.२५	१९.०८	०.००	१९.०८
		५०, इतर खर्च	४.५०	३.१५	०.००	३.१५
		(अ) एकूण महसुली	**१४५.००**	**३८.५०**	**६३.००**	**१०१.५०**
			०.००	**०.००**	०.००	०.००
२	मागणी क्र.O-१०, चांदा ते बांदा योजने अंतर्गत विकासयोजना राबविणे (४५१५०९०५)	५२, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री	१४.५०	११.६०	०.००	११.६०
		५३, मोठी बांधकामे	३०.५०	२०.४०	४.००	२४.४०
		(ब) एकूण भांडवली	**४५.००**	**३२.००**	**४.००**	**३६.००**
		एकूण(अ+ब)	**१९०.००**	**७०.५०**	**६७.००**	**१३७.५०**

(एकूण रु. एकशे सदतीस कोटी पन्नास लाख फक्त)

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.02.12 12:01:26 +05'30'

(वि.फ.वसावे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन